मुंबई उच्च न्यायालयाच्या मा. न्यायमूर्तींच्या युनिट स्टाफमधील शिपाई संवर्गातील १७४ पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे न करता ही पदे कायमस्वरुपी निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

शासन शुद्धिपत्रक क्र. :- पदनि-५९१४/६५५/(८४)/का.चार

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २ डिसेंबर, २०१७

संदर्भ :- शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, समक्रमांक, दि. १५/०७/२०१७.

शासन शुध्दीपत्रक -

संदर्भाधीन दि. १५/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद एक पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा.

"संदर्भाधीन शासन निर्णय, दि. १७/०५/२०१६ व शुद्धिपत्रक, दि. ८/०६/२०१६ अन्वये मान्यता देण्यात आलेली उच्च न्यायालय, मुंबईच्या मूळ शाखा व अपील शाखा तसेच, नागपूर, औरंगाबाद व गोवा खंडपीठांच्या आस्थापनेवरील मा. न्यायमूर्तींच्या युनिट स्टाफमधील शिपाई संवर्गातील (वेतनश्रेणी ४४४०-७४४० + ग्रेड वेतन १३००) प्रति युनिट २ याप्रमाणे न्यायमुर्तीच्या ८७ युनिटसाठी एकूण १७४ शिपाई पदांची कामे बाह्ययंत्रणेद्वारे न करता एक विशेष बाब म्हणून सदरहू पदे उपरोक्त आस्थापनांवर कायमस्वरूपी निर्माण करण्यास तसेच त्यांच्या वेतनावर देय असणाऱ्या आवर्ती खर्चास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर मा. न्यायमुर्तीच्या ८७ युनिट स्टाफपैकी ४ युनिट हे उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाच्या आस्थापनेवरील असून त्यानषंगाने प्रतीयुनिट २ याप्रमाणे एकूण ८ शिपाई संवर्गातील पदे ही गोवा खंडपीठाच्या आस्थापनेवर निर्माण करावयाची अाहेत. याकरिता येणारा आवर्ती खर्चाचा भार गोवा राज्य शासनावर राहील. मा. न्यायमुर्तीच्या सदर ८७ युनिट स्टाफचे वितरण पुढीलप्रमाणे आहे."

पदनाम	उच्च न्यायालय, मुंबई, मुख्यपीठ		नागपूर खंडपीठ	औरंगाबाद खंडपीठ	गोवा खंडपीठ
	मूळ शाखा	अपील शाखा			
मा.न्यायमुर्तीच्या युनिटची संख्या	११	३४	१८	२०	४
प्रति युनिट २ शिपाई याप्रमाणे निर्माण करावयाच्या पदांची संख्या	२२	६८	३६	४०	८

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७१२०६१७०८५०७५१२ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjeev Rajaram Keluskar

Digitally signed by Sanjeev Rajaram Keluskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Low And Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4a521517a0d3fba83ff4473cb0d448a75f9b7f83cba41836833b60c93758c804, cn=Sanjeev Rajaram Keluskar
Date: 2017.12.06 17:13:11 +05'30'

(संजीव केळूसकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
२. मा. मुख्य सचिव तथा अध्यक्ष, उच्चस्तर सचिव समिती यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३. महाप्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता),महाराष्ट्र-एक, मुंबई.
५. महालेखापाल(लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता),महाराष्ट्र-दोन, नागपूर.
६. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
७. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर/औरंगाबाद
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर/औरंगाबाद
१२.वित्त विभाग, व्यय-५/अर्थ ११/वित्तीय सुधारणा
१३.कार्यासन अधिकारी, का. २३/२५, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवड नस्ती.